क्रमांक :- ७३

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

दिनांक २७ ऑगस्ट, २०२० / भाद्रपद ५ , १९४२ शके

संदर्भ :- १) या सचिवालयाचे पत्रक भाग दोन क्र.५१, दिनांक ८ मे, २०२०
२) या सचिवालयाचे पत्रक भाग दोन क्र.५८, दिनांक १९ जून, २०२०
३) या सचिवालयाचे पत्रक भाग दोन क्र.७१, दिनांक ४ ऑगस्ट, २०२०

७३. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या मंगळवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२० रोजी झालेल्या बैठकीत विधानसभेच्या आगामी तृतीय (पावसाळी) अधिवेशनाचा कालावधी दोन दिवसांचा म्हणजेच सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० व मंगळवार, दिनांक ८ सप्टेंबर, २०२० असा निश्चित करण्यात आला आहे. तसेच सदरहू अधिवेशनात फक्त पुरवणी मागण्या व शासकीय विधेयके घेण्याचे व तारांकित प्रश्न व्यपगत न करता फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सोमवार दिनांक ७ सप्टेंबर, २०२० ते शुक्रवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०२० या कालावधीकरिता संदर्भाधीन पत्रक भाग-दोनच्या अनुषंगाने या सचिवालयाकडे प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांच्या सूचनांवर कार्यवाही करुन यापूर्वीच विभागाकडे पाठविण्यात आलेले सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न आता फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : २७ ऑगस्ट, २०२०

राजेन्द्र भागवत,
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत :

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
(३) संगणक कक्ष (Website)